पुण्य नगरी
सोमवार, १९ फेब्रुवारी २०२४

# विवेकानंद कॉलेजचे जेईई मेन्स परीक्षेत यश

**कोल्हापूर :** नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून घेण्यात आलेल्या जेईई मेन्स परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यामध्ये विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी अथर्व महेश करंबळी याने ९३.४५ पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला. त्याचबरोबर ज्युनिअर कॉलेजमधील ओम माने पाटील, श्रावण सागर, अक्षय पटकारे, ऋतुजा ओऊळकर, प्रणाली खाडे, राम अर्चनाकुमारी दरोगा, श्रुती पाटील यांनीही या परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी.प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी विदयार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना विज्ञान विभाग प्रमुख प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एम. आर. नवले, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा. एम. आर. काळेबाग, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. पी. एन. कांबळे, प्रा. एस. एल. पाटील आदींच मार्गदर्शन लाभले.

20/02/24

20/02/24